नियमित दि. दावा क्र.२६५/२०२३
**( CNR NO.MHNS130016432023)**
गणेश शिंगाडे ..वि.. गायत्री शिंगाडे

## निशाणी क्र.१५ खालील आदेश

प्रस्तूत अर्ज हा प्रतिवादी हिने तिचे विरुध्द पारीत झालेला “विना कैफीयतचा” आदेश रद्द व्हावा आणि कैफियत दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ करावा यासाठी केलेला आहे. प्रतिवादी पक्षाचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रतिवादी यांच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादीस दाव्याचे समन्स मिळाले असुन ती सदर दाव्यात हजर झाली. त्यानंतर ती टाईफाईडने आजारी पडली. त्यानंतर तिचेवर औषधोपचार केलेनंतर ती आजारातुन बरी झाली त्यानंतर तिचे १४ महिन्याचे लहान बाळ आजारी पडले. त्यामुळे तिला दाव्यास मुदतीत कैफीयत दाखल करता आली नाही. वादीचे दाव्याचे कामी कैफियत देणेसाठी आवश्यक असणारी सर्व कागदपत्र व माहिती उपलब्ध झाल्याने ती सदर अर्जासोबत कैफीयत दाखल करीत आहे. प्रतिवादीस जबाब व कैफियत दाखल करण्यास १५३ दिवसांचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा हेतुपुरस्पर केलेला नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द “विना कैफीयत व जबाबाचा” आदेश पारीत रद्द करण्यात यावा व प्रतिवादी यांचा प्रस्तूतचा अर्ज मंजूर व्हावा अशी विनंती केली आहे.

३. वादीने सदर अर्जावर म्हणणे दिले असुन त्यात त्यांनी प्रतिवादीने दाव्यात कैफीयत/जबाब देणेस हेतुपुर्वक विलंब केलेला आहे. प्रतिवादीने

तिच्या समर्थनार्थ कुठलाही कायदेशीर पुरावा दाखल केलेला नाही. प्रतिवादीस त्रास देण्यासाठी  व केसचे कामकाज लांबणीवर पाडण्याच्या हेतुने कैफियत दाखल करण्यास विलंब करीत आहे. तरी सदरचा अर्ज खर्चासह मंजुर करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

४. प्रतिवादीचे म्हणणे पाहिले. प्रतिवादीस जबाब/कैफीयत दाखल करण्यास १५३ दिवसांचा  विलंब झालेला आहे.  दिवाणी प्रक्रिया संहितेनुसार प्रत्येक दाव्यात गुणदोषावर चौकशी होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक असते. अशा चौकशीसाठी पक्षकारांचे म्हणणे दाखल होणे व त्यांची योग्य बाजू मांडणे हे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असते. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने नैसर्गिक न्याय तत्वाच्या आधारे प्रतिवादीस त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळणे न्यायोचित आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश:

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांचे विरुध्द झालेला “विनाकैफीयत” आदेश रद्द करण्यात येतो आणि कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

KOLEKAR PRASAD DIPAK

Digitally signed by KOLEKAR PRASAD DIPAK
Date: 2024.11.07 15:39:11 +0530

(पी.डी. कोळेकर)

दिनांकः– ०६/११/२०२४

दिवाणी न्यायाधिश क. स्तर.,
पिंपळगांव बसवंत